# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
# दिनांक 15/03/2019 (शुक्रवार)
# (सकाळ)

---

## जबरी चोरी

पो.स्टे. बोरी :– अंतर्गत 17 कि.मी अंतरावर डवा खापरी रोड खापरी शिवार, शिवाजी मंदिर जवळ येथे दिनांक 14/03/2019 चे 12:30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– योगेश हिरामण सराटे, वय 32 वर्ष, रा. खापरी हे ग्राम पंचायत डवा खापरी कार्यालयातील कर्मचारी असुन नमुद कार्यालय कामकाज दरम्यान त्यांचा पॅन्ट फाटल्याने ते त्याचे मोटरसायकलने घरी पॅन्ट बदलवण्यासाठी येत होते. दरम्यान शिवारात डवा–खापरी रोडवर अचानक समोरून आलेल्या एम.एच.–36/एम.–3360 क्रमांकाची यामाहा मोटरसायकल वरील अंदाजे वय 23 ते 29 वर्ष वयोगटातील तिन अनोळखी आरोपीतांनी फिर्यादीचे मोटरसायकल समोर त्यांची मोटरसायकल अडवले. यानंतर आरोपीतांने फिर्यादीचे पॅन्ट खिश्यातील ग्राम पंचायतचे कर वसुलीचे अंदाजे 3,000/–रू. व शर्टचे खिश्यातील एक मोबाईल 500/–रू. असा एकुण कि. 3,500/–रू. चा मुद्देमाल जबरदस्तीने काढुन हिस्कावुन चोरून पळुन गेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपीविरुध्द कलम 392, 341, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक रामटेके हे करीत आहे.

## घरफोडी

पो.स्टे. भिवापुर :– अंतर्गत 05 कि.मी अंतरावर श्री. निवास बियर बार जवाराबोडी येथे दिनांक 13/03/2019 चे 13:00 वा. ते दिनांक 14/03/2019 ते 11:00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– रमेश मधुकर कावळे, वय 52 वर्ष, रा. पारवे होन्डा शोरूम समोर, भिवापुर यांच्या बारचे किचन मध्ये अज्ञात आरोपीने लोखंडी टिन कापून बारमध्ये प्रवेश केला. तसेच आरोपीने बार मधील विदेशी दारू कि. 9,350/रू. ची व नगदी कि. 980/–रू. चा मुद्येमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. भिवापुर येथे आरोपीविरुध्द कलम  457, 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक धोपाडे हे करीत आहे.

## चोरी

पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत कोल्हार नदीचे बाजुला, अर्धनटेश्वर मंदीर नांदा येथे दिनांक 14/03/2019 चे 01:00 वा. दरम्यान आरोपी नामे– 1) संदीप रमेश वर्मा, वय 23 वर्ष, 2) विनोद रामखिलावन वर्मा, वय 36 वर्ष, रा. चनकापुर, 3) मजर शेख इशाद शेख, वय 24 वर्ष, रा. नागपूर व 4) जहीर शेख वजीर शेख, वय 37 वर्ष, रा. पलौटी नगर, नागपूर यांनी संगणमत करून एमएच– 40/एसी– 5214 क्रमांकाच्या ट्रकचे डिझल टॅक मधिल अंदाजे 20 लिटर डिझल चोरी केले. तसेच आरोपी हे त्यांचे ताब्यातील एमएच– 31/डीव्ही– 9054 क्रमांकाच्या स्विफ्ट डिझायर कार मध्ये डिझल नेतांनी मिळून आले. सदर कार कि. 3,00,000/–रू. व डिझल 2000/–रू. डपकी की 150/–रू. असा एकुण कि. 3,02,150/–रू. चा मुद्देमाल मिळुन आला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 379, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सफौ नामदेव धांडे हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर